# वार्तापत्र

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली दिनांक १७.१०.२०१९

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| पुराडा ३३/२०१९ कलम ३०७,३५३,१४३,१४७,५०६,१०९,१८८, भादवि सहकलम ६५ (अ) ८३, ९८ (क) महा. दारुबंदी अधि. सहकलम १८४ मोटार वाहन अधिनियम | मौजा रामगड ते भटेगाव रोड दर. रामगड शिवार ५ किमी दक्षिण<br><br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक १६.१०.२०१९ चे ०१.२० ते ०९.३० वा.पर्यत | सरकार तर्फे :- पोउपनि भागवत यु. कदम नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>पाहिजे आरोपीतांचे नाव :-<br>१. निर्मल अंकालु धमगाये व इतर त्याचे सहकारी दारु विक्रेते |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी, पोउपनि भागवत कदम, दादाजी करकाडे, भाऊराव बोरकर, कानु गुरुनुले, नुतेश धुर्वे, मानीक निसार स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक, कार्या. गडचिरोली | |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हायातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील आंध्रप्रदेश,छत्तीसगड, मध्यप्रदेश तसेच सिमावर्ती गोंदिया, भंडारा, तसेच नागपुर जिल्हयातील अनुज्ञाप्तीधारक दारु विक्री दुकाणातुन दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने जंगलमार्गे आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असतात, अशा अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक १६.१०.२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथकास गोपनिय सुत्रांकडुन माहिती मिळाली की, मौजा कोरची येथील ठोक दारु विक्रेता निर्मल धमगाये हा त्याचे सहकाऱ्यांच्या मदतीने मौजा पुराडा,रामगड परिसरात त्याचे मोठया वाहनाने दारुचा माल आणणार आहे. व त्या मालाची तेथुन परस्पर इतर दारु विक्रेत्यांच्या वाहनाने विल्हेवाट लावणार आहे. सदर माहिती बाबत तात्काळ वरिष्ठांशी चर्चा करुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखे कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी रात्रोच माहितीच्या ठिकाणी पोहचुन सापळा रचला बातमीप्रमाणे ठरलेल्या ठिकाणी निर्मल धमगाये याचे मोठया प्रमाणात दारुचा साठा असलेले एक बोलेरो पिकप चारचाकी वाहन मौजा रामगड ते भटेगाव रोड दरम्यान पोहचले निर्मल धमगाये याने इतर दारु विक्रेत्यांशी आधिच बोलणी केली असल्याने दारुचे बॉक्स लोड असलेले वाहन पोहचताच त्याचे पाठोपाठ दोन वेगवेगळे बोलेरो चारचाकी वाहने व मोटार सायकल ने परिसरातील दारु विक्रेते दारुचा माल घेवुन जाण्याकरीता आले. मालाची अदलाबदल होत असतांना पोलीसांनी ठरल्याप्रमाणे छापा घातला असतांना दारु विक्रेत्यांना पोलीसांची चाहुल लागल्याने काही दारु विक्रेत्यांनी त्यांचे ताब्यातील वाहनाने पोलीसांना चिरडुन ठार मारण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलीस पथकाचे सावधगीरीमुळे जिवीतहाणी टळली. पोलीसांचा वाढता प्रभाव पाहुन दारु विक्रेत्यांनी त्यांचे ताब्यातील चारचाकी वाहने घटनास्थळी सोडुन अंधाराचा व जंगलाचा फायदा घेवुन पळ काढला. घटनास्थळावरील वाहनांची पाहाणी केली असता, त्यामध्ये मोठया प्रमाणात छत्तीसगड राज्य निर्मीत विदेशी दारुचा साठा मिळुन आला. त्यामध्ये गोवा व्हिस्की कंपनीच्या एकुन २५०० निपा, गोल्डन गोवा व्हिस्की कंपनीच्या एकुन ७५० निपा, इंपेरियल ब्लयु व्हिस्की कंपनीच्या एकुन ९६० निपा, अशा प्रकारे एकुन १५,४६,५००/- रुपये किमंतीचा दारुचा साठयासह ११,४५,०००/- रुपये किमंतीचे वाहने व इतर मुदेमाल असा एकुन २६,९८,५००/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्ती करण्यात आला. व घडलेल्या घटनेसंबधात पोलीस उप निरीक्षक भागवत कदम यांनी पोलीस स्टेशन पुराडा येथे दिलेल्या लेखी तक्रारीवरुन वरील प्रमाणे कायदेशिर कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई मा.श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली, मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी, पोउपनि भागवत कदम, दादाजी करकाडे, भाऊराव बोरकर, कानु गुरुनुले, नुतेश धुर्वे, मानीक निसार यांनी केली आहे. आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक-२०१९ च्या निवडणुका संदर्भात निवडणुक आयोगाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे भयमुक्त किंवा कुठलेही प्रलोभनास मतदात्यांनी बळी पडु नये याकरीता स्थानिक गुन्हे शाखेमधील पोलीस पथका कडुन गडचिरोली जिल्हयात अहोरात्र अवैध दारु रेड संबधात मोहिम राबवुन करीत असलेल्या प्रभावी कारवाई मुळे अवैध दारु विक्रि करणारे तसेच बेकायदेशिर रित्या दारुची वाहतुक करणा-या लोकांचे आणि अवैध धंदयाशी निगडीत लोकांचे धाबे दणानले आहेत.





